जनतेचा आवाज असलेल्या दै.आपला महाराष्ट्रचे सत्तराव्या वर्षात पदार्पण!

डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
दि.५ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.
संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)
भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.NO./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३५९ ■ शुक्रवार २ ऑक्टोबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

भतवाल हॉस्पिटल म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

## टायपिंग परीक्षेतील गैरप्रकारांचा पर्दाफाश आठ हजार विद्यार्थ्यांनी पुन्हा परीक्षा द्यावी

**पुणे, दि. १ : राज्य परीक्षा परिषदेमार्फत जुलै २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे उघडकीस आले आहे. राज्यातील ११ परीक्षा केंद्रांवरील तब्बल ९० संस्थांमध्ये विविध अनियमितता आढळून आल्या आहेत. या प्रकारामुळे संबंधित संस्थांमधील सुमारे ८ हजार विद्यार्थ्यांचा निकाल राखीव ठेवण्यात आला असून, त्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. परीक्षेतील पारदर्शकता कायम राखणे, संस्थाचालकांचा विश्वास टिकवणे आणि भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालणे, या उद्देशाने संबंधित विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्यात येणार आहे. राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी ही माहिती दिली.**



परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी करण्यात आलेल्या तपासणीत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांनी केवळ की-बोर्डवर बोटे ठेवून परीक्षा देत असल्याचा दिखावा केला. तर काही परीक्षा केंद्रांवर शिक्षकच विद्यार्थ्यांच्या वतीने पेपर सोडवत असल्याचे आढळले. गैरप्रकार लपवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा अँगल बदलणे, कॅमेऱ्याच्या दृश्यात अडथळे निर्माण करणे आणि परीक्षा कक्षात जाणीवपूर्वक अंधार करणे, अशा क्लृप्त्यांचाही वापर करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. गंगाखेड येथील एका परीक्षा केंद्रावर परीक्षेचे रेकॉर्डिंग व्यवस्थित पाहता येऊ नये, यासाठी एका सीसीटीव्ही कॅमेऱ्याला गम लावण्यात आला होता. काही केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या दृश्यात बदल करून बोगस उमेदवारांना परीक्षेला बसवण्याचा प्रयत्न झाल्याचेही तपासात समोर आले. तसेच, काही ठिकाणी उमेदवार परीक्षा केंद्रावर येण्यापूर्वीच ऑनलाइन लॉगीनमध्ये पेपर सोडवला जात असल्याचे तर विद्यार्थी केंद्रातून निघून गेल्यानंतरही ऑनलाइन प्रणालीमध्ये त्यांच्या नावाने परीक्षा सुरू असल्याचे आढळून आले.

**आयडी-पासवर्डशिवाय परीक्षा**

ऑनलाइन डॅशबोर्डवरील उमेदवारांची संख्या आणि प्रत्यक्ष परीक्षा केंद्रातील उपस्थिती यामध्ये तफावत आढळली. काही केंद्रांवर ऑनलाइन प्रणालीमध्ये जास्त उमेदवार परीक्षा देत असल्याचे दिसून आले, तर सीसीटीव्ही फुटेजमध्ये **(पान ४ वर)**



विनम्र अभिवादन!

राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन! - संपादक

## दिवेआगर समुद्रात आठ मुलांचा मृत्यू

रायगड, दि. १ : रायगड जिल्ह्यातील दिवेआगर समुद्र किनारी आज (दि.१) भीषण दुर्घटना घडली. समुद्रात पोहण्याचा आनंद घेत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. हे सर्व **(पान ४ वर)**

## कर्जमुक्ती योजनेत जिल्ह्यातील तीन हजार दोनशे अठ्ठावन्न शेतकऱ्यांना दिलासा- पालकमंत्री रावल

**धुळे, दि.१- राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ अंतर्गत लाभ वितरणाच्या तिसऱ्या टप्प्यात धुळे जिल्ह्यातील ३,२५८ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर ३३ कोटी १ लाखांचा लाभ वर्ग करण्यात आला आहे. कर्जाच्या ओझ्यातून शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांना पुढील हंगामासाठी पुन्हा सक्षम करण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची ठरत असल्याची माहिती राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.**



पालकमंत्री रावल यांनी सांगितले की, राज्य मंत्रिमंडळाच्या २ जून, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत या योजनेला मान्यता देण्यात आली. त्याच दिवशी शासन निर्णयाद्वारे योजना जाहीर करण्यात आली असून, १५ जुलै, २०२६ रोजी तिच्या काही निकषांमध्ये अंशतः सुधारणा करण्यात आली. कर्जमुक्ती आणि एकरकमी तडजोड या घटकांच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १२ राष्ट्रीयीकृत बँका तसेच इतर खासगी बँका अशा एकूण ५३ बँकांनी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांची माहिती महाआयटीमार्फत विकसित पोर्टलवर अपलोड केली आहे.

या प्रक्रियेत राज्यभरातील सुमारे ३२ लाख कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर नोंदविण्यात आली आहे. योजनेच्या निकषानुसार पात्र ठरलेल्या थकबाकीदार शेतकऱ्यांपैकी सुमारे २०.१५ लाख शेतकऱ्यांची यादी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आली. त्यापैकी ३० सप्टेंबरअखेर १७.२१ लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असल्याचे श्री. रावल यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या पात्र शेतकऱ्यांना **(पान २ वर)**

## तपनभाई पटेल हॉस्पिटलमध्ये पद्मश्री डॉ. संजय ओक यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांवर होणार शस्त्रक्रिया

**शिरपूर, दि.१- तपनभाई पटेल हॉस्पिटल मध्ये श्री विलेपार्ले केळवणी मंडळ अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या प्रेरणेने तसेच पद्मश्री डॉ. संजय ओक यांच्या मार्गदर्शनाखाली १ ते ३ ऑक्टोबर दरम्यान १२० हून अधिक बालकांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येत आहे.**

जन्मजात व्याधी, विविध बालरोग तसेच शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या आर्थिकदृष्ट्या गरजू बालकांसाठी शिरपूरमध्ये पुन्हा एकदा मोठ्या



प्रमाणावर मोफत बालरोग शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. एस.व्ही. के.एम. संचलित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर, खर्दे बु. ता. शिरपूर येथे दि.१ ते ३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हे विशेष शिबिर होणार असून, या शिबिरात १२० हून अधिक बालकांवर पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

बालरोग शल्यचिकित्सा क्षेत्रातील ज्येष्ठ व नामांकित तज्ज्ञ, केईएम रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता आणि डॉ. बी. सी. रॉय पुरस्काराने सन्मानित पद्मश्री डॉ. संजय ओक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या तज्ज्ञ टीमकडून या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. डॉ. ओक यांच्या वैद्यकीय व सामाजिक सेवाकार्याला नुकताच पद्मश्री आर. के. गांधी पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने त्यांच्या कार्याचा गौरव आणखी अधोरेखित **(पान ४ वर)**

## एसआयआर प्रक्रिया थांबवून मतदारांचे हक्क पुनर्स्थापित करा

नंदुरबार, दि.१(प्रतिनिधी)- निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत विविध प्रश्न उपस्थित करत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नंदुरबार तालुका कमिटीच्या वतीने तहसीलदार संतोष डेरे यांना निवेदन देण्यात आले. एसआयआर (विशेष सखोल पुनरावलोकन) प्रक्रिया थांबवावी आणि चुकीच्या पद्धतीने मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवडणूक प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास कायम राहण्यासाठी निवडणूक आयोगाची विश्वासार्हता **(पान ४ वर)**

## पोक्सोच्या गुन्ह्यातील आरोपीला वीस वर्षाची शिक्षा व तेरा हजाराचा दंड

**नंदुरबार, दि.१(प्रतिनिधी)- नवापूर पोलीस ठाणे हद्दीतील तिनटेबा गोसावीवाडा, ता. नवापूर येथील १५ वर्षे ८ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी अजय ऊर्फ निखील ताराचंद राठोड याला. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांनी दोषी ठरवत २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा तसेच एकूण १३,५०० रुपयांचा दंड ठोठावला.**

पीडित बालिका नवापूर शहरातील एका विद्यालयात इयत्ता १० वीमध्ये शिक्षण घेत होती. दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी ती आपल्या लहान बहिणीसह स्कुटीवरून शाळेत गेली होती. शाळेत गेल्यानंतर तिने स्कुटीची चावी मैत्रिणीकडे देऊन वही घेण्याचे कारण सांगत शाळेतून बाहेर पडली. मात्र, सायंकाळपर्यंत ती घरी परतली नाही. त्यामुळे तिच्या पालकांनी व नातेवाईकांनी आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला. मुलगी न मिळाल्याने पालकांच्या फिर्यादीवरून नवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ६०९/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन नवापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांनी तपास पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब लांडगे यांच्याकडे सोपविला. तपास अधिकारी व त्यांच्या पथकाने शास्त्रोक्त पद्धतीने तपास करून दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी पीडित बालिकेचा शोध घेतला. तिला धीर देऊन विश्वासात घेतल्यानंतर तिने आरोपी अजय ऊर्फ निखील ताराचंद राठोड याने तिचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे सांगितले. त्यानंतर गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४(१), ६५(१) तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ व १२ **(पान ४ वर)**

## गुजराती समाजाची अकोल्यात ४ ता.बैठक; ॲड.संजीव वानी

धुळे-महाराष्ट्र गुजराती समाज महामंडळाच्या कार्यकारिणी समितीची महत्त्वपूर्ण सभा रविवार दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी अकोला (विदर्भ) येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती महामंडळाचे चिटणीस ॲड. संजीव वानी यांनी दिली आहे.

या सभेला महाराष्ट्रातील विविध शहरांमधून गुजराती समाजाचे प्रतिनिधी, पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. बैठकीत समाजाची एकता, संघटन, सामाजिक उपक्रम आणि भविष्यातील विकास आराखड्यावर महत्त्वपूर्ण चर्चा व निर्णय घेतले जाणार आहेत. तसेच अकोला **(पान ४ वर)**

## चोरीच्या दुचाकीवरील दोन्ही अज्ञात तरूण अपघातात ठार

**सोनगीर दि.१ (प्रतिनिधी)- मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर सोनगीरच्या वाघाडी फाट्यावर आज गुरुवारी पहाटे एका रस्ता अपघातात दोन अज्ञात तरुणांचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे, अपघातग्रस्त दुचाकी ही संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथून चोरीला गेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर अपघात सोनगीरकडून शिरपूरकडे जाणाऱ्या सर्विस रस्त्यावर झाल्याचे समजते. यामुळे अपघातातील मृत्यू युवक सोनगीरकडून शिरपूरकडे जात असल्याचा अंदाज आहे.**

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, गुरुवारी पहाटे वाघाडी फाट्या नजीक दोन तरुण गंभीर जखमी अवस्थेत महामार्गाच्या कडेला पडून असल्याची माहिती सोनगीर पोलिसांना मिळाली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत रुग्णवाहिकेद्वारे दोन्ही जखमींना उपचारासाठी धुळे जिल्हा रुग्णालयात हलवले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला होता, तर दुसऱ्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दरम्यान,अपघातग्रस्त दुचाकीची (होंडा शाईन, **(पान ४ वर)**



## साक्री तालुका शेतकरी सहकारी संघाची सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**साक्री, दि.१- साक्री तालुका शेतकरी सहकारी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा अत्यंत उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. तालुक्यातील शेतकरी सभासद, संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सभेत संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला.**

सभेच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सभेचा शुभारंभ **(पान २ वर)**

## मुख्य निवडणुक आयुक्त ज्ञानेश कुमारांना पदावरून तात्काळ हटवा; डाव्यांसह पुरोगामी संघटनेची मागणी

**धुळे, दि.१- निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवावे, विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकनाची प्रक्रिया तातडीने थांबवावी आणि चुकीच्या पद्धतीने मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करावेत, अशा विविध मागण्या डाव्या व पुरोगामी पक्ष, संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आल्या आहेत. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धुळे जिल्हाधिकारी कार्यालयाचे निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले.**

निवेदनात नमुद केले आहे की,



भारतीय निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीसह मतदार यादी आणि एसआयआर प्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाची स्वायत्तता, पारदर्शकता आणि जनतेचा संस्थेवरील विश्वास याबाबत निवेदनकर्त्यांनी चिंता निर्माण केली आहे. निवेदनानुसार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्ताचा संदर्भ देत, विद्यमान मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कार्यकाळात निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्न उपस्थित झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तीनपैकी दोन निवडणूक आयुक्तांनी मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे, पुन्हा समाविष्ट करणे तसेच एसआयआरच्या अंमलबजावणीशी संबंधित निर्णयांवर आक्षेप नोंदवल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. एसआयआर प्रक्रिया केवळ मतदार यादीच्या पुनरावलोकनापुरती मर्यादित नसून मतदारांच्या मूलभूत मतदानाच्या अधिकाराशी **(पान २ वर)**



## पोषण आहार गैरव्यवहार प्रकरणी मुख्याध्यापकांच्या निलंबनाची मागणी

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- नेशनल एज्युकेशन सोसायटी संचलित अलहाज काझी चिरागोद्दीन उर्दू प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहाराच्या कथित गैरव्यवहारप्रकरणी संबंधित मुख्याध्यापकांवर तातडीने निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे राज्य उपाध्यक्ष जाकीरमिया जहागीरदार व शिष्टमंडळाने केली आहे. या मागणीसाठी गुरुवारी जिल्हा परिषद कार्यालयासमोर एक दिवसीय आमरण उपोषण करण्यात आले.**

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी शाळेचे माजी मुख्याध्यापक मोहम्मद रजा अब्दुल समद यांनी शालेय पोषण आहाराच्या मानधनाबाबत चुकीची माहिती सादर करून २१ हजार ७९४ रुपयांचा अपहार केल्याचे प्रकरण समोर आले होते. याप्रकरणी शिक्षण विभागाने २००४ मध्ये कारणे दाखवा नोटीस बजावली होती. संबंधित रक्कम वसूल केल्यानंतर वेतनवाढ रोखणे तसेच पदावनतीची कारवाई करण्यात आल्याचा दावा अर्जात करण्यात आला आहे.

दरम्यान, सध्या फयाजखान मुनाफखान पठाण व सलाउद्दीन अलियोद्दीन काझी यांच्याविरुद्ध शालेय पोषण आहाराच्या कथित गैरव्यवहारप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी १५ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, **(पान ४ वर)**

## सायने येथील घरफोडीचा उलगडा; चोरटा अटकेत

सोनगीर दि. १(प्रतिनिधी)- धुळे तालुक्यातील सायने येथे १५ सप्टेंबर रोजी झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा धुळे जिल्हा गुन्हा अन्वेषण शाखेने यशस्वी उलगडा केला आहे. या प्रकरणी जळगाव जिल्ह्यातील एका सराईत चोरट्याला जेरबंद करण्यात आले असून, त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सायने येथील रहिवासी जगदीश वसंत पाटील यांच्या बंद घराचे कुलूप उघडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. घराच्या मागील खोलीतील लोखंडी कपाटाचे लॉक तोडून लॉकरमध्ये **(पान ४ वर)**



## जातीय-धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या तृतीयपंथींवर कारवाई करण्याची मागणी

**धुळे, दि.१- महाराष्ट्रात जातीय व धार्मिक तेढ निर्माण करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत समस्त किन्नर समाज व आराधी जोगती समाजबांधवांनी प्रशासनाकडे संबंधित व्यक्तींवर चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

याबाबत प्रशासनाला दिलेल्या निवेदनात विकास तुकाराम डावखर उर्फ आशा पुजारी (मुंबई), स्वप्निल पोटपिल्लेवार उर्फ सुहान शेख (गुड्डी, छत्रपती संभाजीनगर), सुनील उर्फ सारिका (नाशिक) आणि सोनाली उर्फ जोया (नाशिक) यांच्याविरोधात तक्रारी करण्यात आल्या आहेत.

निवेदनानुसार, संबंधित व्यक्ती विविध माध्यमे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून कथितरीत्या आक्षेपार्ह व भडकाऊ विधाने करीत असून, त्यामुळे जातीय व धार्मिक भावना दुखावण्यासह सामाजिक वातावरणावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच व्हिडिओच्या माध्यमातून **(पान २ वर)**

## बारा ऑक्टोंबरपर्यंत मनाई आदेश लागू

धुळे, दि.१- धुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबादीत राखण्यासाठी २८ सप्टेंबर ते १२ ऑक्टोंबर, २०२६ या कालावधीत प्रतिबंधात्मक मनाई आदेश मुंबई पोलिस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये लागू राहतील, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शरद पवार यांनी दिले आहेत.

सदरचे आदेश पाच पेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही मंडळीस (जमावास) किंवा मिरवणूकीस मनाई करील. या कालावधीत सभा, मिरवणूका, मोर्चा, मिटींग कार्यक्रम व रॅली इत्यादी परवानगीबाबत स्थानिक पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी कायदा व **(पान ४ वर)**

## म.गांधी जयंती धुळे कृऊबा बंद

धुळे, दि.१- महात्मा गांधी जयंती निमित्ताने धुळे कृषि उत्पन्न बाजार समिती बंद राहणार आहे. अशी माहिती सभापती योगेश विनायक पाटील यांनी दिली आहे.

महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त बाजार समिती व्यवस्थापनाला सुटी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे नियमनाखालील शेतीमालाचे व्यापार व्यवहार बंद राहणार आहेत. कोणीही आपला शेतीमाल धुळे बाजारात विक्रीस आणू नये. असे आवाहन कृषी उत्पन बाजार समिती सभापतींनी केले आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,37,550 रु.+3% GST
सोने- 24 K -1,49,000 रु.+3% GST
चांदी- 2,27,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## तिव्र दुष्काळामुळे शेतकरी संकटात हेक्टरी लाखाची मदत द्या- जितेंद्र मराठे

**धुळे, दि.१- जिल्ह्यात यंदा अत्यल्प पर्जन्यमानामुळे खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, तसेच संपूर्ण कर्जमाफी करावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र उत्तमराव मराठे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.**



धुळे जिल्ह्यातील धुळे, साक्री, शिंदखेडा आणि शिरपूर या चारही तालुक्यांमध्ये गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे कपाशी, मका, तूर, बाजरी, कांदा, पपई, सोयाबीन **(पान २ वर)**

## गांधी जयंती निमित्त रमेश दाणेंची मुलाखत

धुळे, दि.१- महात्मा गांधीजींच्या १५८ व्या जयंती निमित्त महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळ व भूदान बोर्डाचे अध्यक्ष रमेश दाणे यांची मुलाखत धुळे आकाशवाणीच्या इंद्रधनुष्य या सदरात आज २ आक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रसारित केली जाणार आहे. गांधीजींचे विचार, साहित्य,त्यांचे अनुयायी इत्यादी संदर्भ या मुलाखतीत आले आहेत.आकाशवाणीच्या उदघोषक कविता अत्राम यांनी ही मुलाखत घेतली आहे. रसिक श्रोत्यांनी या माहितीपूर्ण, प्रबोधनात्मक मुलाखतीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## शासकीय कार्यालया बाहेरील वाळूच्या टॅक्टरची चोरी, चालक मालकाला अटक

**धुळे, दि.१- शासकीय कार्यालयाच्या आवारातुन वाळुने भरलेले ट्रॅक्टर चोरणारे ट्रॅक्टर मालक, चालक हेच चोर निघाले. दोघांना शिंदखेडा पोलीसांनी जेरबंद केले.**

अवैध गौण खनिज वाहतुक करणारे ट्रॅक्टर महसुली कारवाई करिता शिंदखेडा तहसील कार्यालय येथे जप्त केले होते. २७ सप्टेंबरला दुपारी एकच्या सुमारास दोन जणांनी शिंदखेडा तहसिल कार्यालयाच्या आवारात प्रवेश करुन ट्रॅक्टर चोरुन नेले. याप्रकरणी मंडळ अधिकारी मोहन नथ्थुराव पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिंदखेडा पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियमान्वये गुन्हा दाखल झाला होता.

सहाय्यक पोलीस निरीक्षक मयुर भामरे यांनी गुन्हा उघडकीस आणणेकरिता पथक तयार केले. पथकाने घटनास्थळ परिसराचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. ट्रॅक्टर मालक निलेश विश्वास पाटील (वय ३५), चालक **(पान २ वर)**

# आपला महाराष्ट्र

## सत्तराव्या वर्षात पदार्पण करताना...!

आज खानदेशातील आपला महाराष्ट्र हे दैनिक सत्तराव्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्त आमच्या असंख्य वाचकांना, हितचिंतकांना, जाहिरातदारांना आणि कर्मचाऱ्यांना वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा. जेव्हा संगणक आला आणि त्यानंतर मोबाईल आला तेव्हा अनेकांनी असे भाकीत केले होते की, छापील माध्यमांचा अर्थात वृत्तपत्रांचा जमाना आता लवकरच संपुष्टात येणार आहे. मोबाईलवर पीडीएफ च्या माध्यमातून दैनिक वाचायला मिळेल त्यामुळे छापील आवृत्तीची गरज भासणार नाही. आज मोबाईलवर किंवा संगणकावर प्रसिद्ध झालेली दैनिके, साप्ताहिके, मासिके मेलवर, व्हाट्सअप वर सोशल माध्यमाच्या साधनातून येत असतात. मात्र सगळ्यांनाच ते वाचता येत नाहीत. किंवा लेख अग्रलेख आणि बातम्या अनेकांना मोबाईल मधून वाचण्याचा कंटाळा येतो. त्याचा त्रासही होतो. म्हणून सगळी आधुनिक साधने आपल्या पुढ्यात असताना प्रत्येक घरात कुठले तरी एक वृत्तपत्र आजही पडते. दिवसभरातून किंवा वेळ मिळेल तसे ते वृत्तपत्र वाचले जाते. ज्यांना भरपूर वेळ आहे किंवा रिकामपण आहे ते ज्येष्ठ नागरिक दिवसभर वृत्तपत्रातील विविध माहिती आणि इतर मजकूर वाचत असतात. विविध चळवळींना वाहिलेली नियतकालिके डिजिटल स्वरूपात किंवा छापील स्वरूपात आजही निघताच आणि वाचली जातात. वृत्तपत्रांचा खप डिजिटल माध्यमांमुळे कमी न होता वाढलेला आहे. याचा अर्थ छापील माध्यमे किती आवश्यक आहेत हे आपल्या लक्षात येईल.

त्या पार्श्वभूमीवर आपला महाराष्ट्राची वाटचाल कलेने वाढणाऱ्या चंद्रासारखी आहे. गांधी जयंतीच्या दिवशी सुरू झालेल्या या वृत्तपत्राचा इतिहास आश्चर्यकारक आहे.. आपला महाराष्ट्राचे संपादक संस्थापक लोकमित्र भाई मदाने यांनी आपली सायकल विकून या वृत्तपत्राची मूर्तमेढ रोवली होती. त्या काळात टाईप पुण्यातून महाराष्ट्रात जात असे. त्यासाठी टाईप फाउंड्रीला दोन महिने आधी ऑर्डर द्यावी लागत असे आणि मग टाईप तयार झाल्यानंतर घ्यायला जावे लागत असे. पुण्याच्या प्रकाश टाईप फाउंड्री चे एक एजंट धुळ्यात होते आणि ते हे काम करीत असत. हे खिळे किंवा टाईप जोडण्याचे काम कंपोझिटर करीत असत. मुद्रण व्यवसायात दैनिक जर सोडले तर छोट्या छापखान्यात एखादा दुसरा कंपोझिटर असायचा. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर दैनिकाला लागणारा कामगार हा तेथेच तयार करावा लागत असे. त्याचे प्रशिक्षण होऊन तो तिथेच काम करायचा. त्या दृष्टीने आपला महाराष्ट्र ही प्रशिक्षण शाळाच होती. त्या शाळेने अनेक मुद्रण कामगार घडविले. त्यांना यथायोग्य मोबदला दिला. त्यानंतर मशिनरी बदलत गेली आणि संगणक आला. छपाईची गुणवत्ता बदलली. आकर्षक मांडणी होऊ लागली. सकस साहित्य आणि निवडक बातम्यांची मांडणी लक्ष वेधून घेणारी होऊ लागली. विशेष म्हणजे आजचा जो काळ आहे त्या काळात नियतकालिके आणि जिल्हा वृत्तपत्रे तग धरून सुरू राहतील अशी स्थिती राहिलेली नाही. एक तर खूप लाचारी पत्करून आणि वैचारिक तडजोडी स्वीकारून वृत्तपत्रे चालविण्याचा आजचा काळ आहे. काहींच्या उदरनिर्वाहाचा तो भाग असल्यामुळे त्यांना अशा तडजोडी स्वीकाराव्या लागतात. शेवटी प्रत्येकाचे प्राधान्यक्रम असतात आणि त्यानुसार त्यांच्या जीवनाची वाटचाल चाललेली असते. आम्हाला कोणाच्या वाटचालीची मीमांसा करावयाची नाही. त्यांचे वैचारिक अधिष्ठान त्यांना लखलाभ असो.

आमची भूमिका गेल्या ७० वर्षात कुठेही बदललेली नाही हा आमच्या स्वाभिमानाचा मुद्दा आहे. गोरगरीब आदिवासी दलित यांच्यासोबत आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढणारे वृत्तपत्र म्हणून आपला महाराष्ट्राची ख्याती आहे. तो वसा आणि वारसा जपत भाई मदाने यांच्यानंतर आम्ही वाटचाल सुरू ठेवलेली आहे. जी भूमिका गोरगरीबांच्या संदर्भात दलित आदिवासींच्या संदर्भात आपला महाराष्ट्र निभावत आलेला आहे त्यात आम्ही कुठलाही फरक केलेला नाही. हातावर पोट भरणाऱ्यांचे हित संबंध जोपासताना शहराची आणि जिल्ह्याची अर्थव्यवस्था सुदृढ ठेवणाऱ्या व्यापारी आणि उद्योजकांची पाठराखण सुद्धा आम्ही केली. जीएसटी संबंधीच्या विरोधातील मुद्दा असेल किंवा अन्य व्यापारी वर्गाच्या दृष्टीने नुकसानकारक मुद्दे असतील त्यांच्यासोबत राहण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. थोडक्यात ज्या-ज्या ठिकाणी सत्याचा आणि न्यायाचा आविष्कार असेल त्या-त्या ठिकाणी आपला महाराष्ट्र बलदंडपणे उभा राहिलेला आहे, तसा गेल्या ६९ वर्षापासून चा इतिहास आहे. आज देशात आणि राज्यात राजकीय दृष्ट्या फार विचित्र परिस्थिती निर्माण झालेली असताना त्या परिस्थितीत विचारांशी कुठलीही तडजोड न करता वृत्तपत्र चालवणे फार कठीण आहे. परंतु, उलट्या प्रवाहासोबत पोहताना सर्व गुणदोष स्वीकारत दोन्ही जिल्ह्यातील हितचिंतकांनी आणि जाहिरातदारांनी जे सहकार्य आपला महाराष्ट्राला केले त्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. आपल्या सहकार्याशिवाय पत्रकारितेची आजच्या काळातील अवजड पालखी खांद्यावर घेत चालत राहणे कठीण होते याची आम्हाला जाणीव आहे. आमचे सहकारी कर्मचारी यांचाही त्यात मोलाचा वाटा आहे याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही.

नेहमी वृत्तपत्र चालविणे हे तलवारीच्या धारेवर चालण्यासारखे आहे. ती दुधारी तलवार आहे असे आपण ऐकत आलेलो आहोत परंतु सध्याचा काळ हा अशाच प्रकारचा आहे आणि या म्हणींचे प्रत्यंतर पदोपदी येत आहे. गांधीजींनी सार्वजनिक जीवन जगताना सात सामाजिक आणि नैतिक पापांचा उल्लेख केलेला आहे. श्रम किंवा कर्मा शिवाय धन कमावणे समाजात अन्यायाला जन्म देते, नैतिकतेचा किंवा विवेकाचा बळी देऊन मिळालेला आनंद हे पाप आहे. चारित्र्याशिवाय ज्ञान काही उपयोगाचे नाही. नैतिकतेचा अभाव समाजासाठी घातक ठरू शकतो. मूल्यांचा त्याग करून नफा कमावण्याच्या दृष्टीने केलेला व्यापार हे पाप आहे. मानवता विरहित विज्ञान ही संहाराची निशाणी आहे. त्याग जर नसेल तर पूजा काही उपयोगाची नाही. कर्मकांड केवळ देखावा आहे आणि तत्व नसेल, सिद्धांत नसेल तर राजकारण निरुपयोगी आहे. नैतिकता, मूल्ये विरहित राजकारण हे स्वार्थ साठी केलेले असते म्हणजेच पाप आहे अशी संकल्पना गांधीजींनी मांडली होती. आज या नीती मूल्यांचा प्रचंड ऱ्हास झालेला आहे. तो सार्वजनिक जीवनात जेवढा आहे त्यापेक्षा कैक पटीने राजकारणात आहे. पत्रकारितेचे क्षेत्र देखील त्यातून सुटलेले नाही. वरिष्ठ पातळीवरचे इलेक्ट्रॉनिक मीडिया असोत की छापील माध्यमे असोत त्यातील बहुतेकांनी नीतमत्तेला फारकत दिलेली आपण बघतो. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या स्तरावर किंवा प्रदेशाच्या स्तरावर साखळी वृत्तपत्रांच्या स्पर्धेत विशिष्ट ध्येयवादाने एखादे वृत्तपत्र चालविणे म्हणजे पदरात निखारे बांधून चालणे आहे या संबंधीचा अनुभव आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून घेत आहोत. असे असले तरी डगमगून न जाता ही वाटचाल आम्ही चालूच ठेवू अशी ग्वाही आजच्या दिवशी देऊ इच्छितो. पुनश्च सदिच्छा.

## स्व.पप्पाजींचा स्मृतिदिन सिकलसेल शिबिर संपन्न

शिरपूर, दि.१- एच.आर. पटेल कनिष्ठ महाविद्यालय, शिरपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वर्गीय रसीकलाल पटेल ऊर्फ पप्पाजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त सिकलसेल तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उदघाट्न स्व. पप्पाजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून प्राचार्य एस. जे. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनीमध्ये सिकलसेल आजाराबाबत जागरूकता निर्माण करणे, वेळेवर तपासणीचे महत्त्व पटवून देणे तसेच आरोग्यविषयक काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शिबिरात विद्यार्थ्यांची सिकलसेल ३८ विद्यार्थिनींची तपासणी करण्यात आली. तसेच सिकलसेल आजाराची कारणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि आरोग्यविषयक काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरास डॉ. पंकज चव्हाण, नितीन महाले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. जे. पाटील होते. यावेळी पर्यवेक्षक बी.बी. अग्रवाल यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आर. आर. रघुवंशी, ए.ए.पाटील, शिला चौधरी, भूषण मोरे, अतुल जाधव, झेड. आर.मन्सूरी, मनीषा पटेल, वंदना महाजन, रेखा साळुंखे, भारती पाटील, शमीना शेख, पुरुषोत्तम पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक चौधरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले.

## देवरे तंत्रनिकेतन व्याख्यान संपन्न

धुळे दि :- श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे तंत्रनिकेतन मध्ये संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे तृतीय वर्ष पदविका विद्यार्थ्यांसाठी रिझ्युम (बायोडाटा) बनवणे व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर तज्ञ व्याख्यानाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी विविध नामांकित कंपन्यांमध्ये मानव संसाधन (एच आर) क्षेत्रात कार्य केलेले अनुभवी असलेले मा श्री अथर्व विसपुते हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. आयोजनासाठी तंत्रनिकेतन प्राचार्य प्रा संजय हिरे, तसेच संगणक विभागीचे विभागप्रमुख प्रा निशाद पटेल आर्टिफिशियल इंटेलिजन्स विभागाच्या विभागप्रमुख प्रा.रत्ना पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या प्रसंगी संगणक विभागातील प्रा. चंद्रशेखर भामरे, प्रा. साहिल पाटील, प्रा. निकेत शर्मा, प्रा. रिद्धी पाटील, प्रा. ऐश्वर्या पाटील, प्रा. रेणुका घात्रक, आदी मान्यवर प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. पूनम सोनवणे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्साहात या मार्गदर्शन वर्गाचा समारोप झाला.

पान १ वरुन

## साक्री तालुका शेतकरी सहकारी संघाची

करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी साक्री तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दिलीप काकुस्ते होते. याप्रसंगी शेतकी संघाचे अध्यक्ष शिरीष सोनवणे, उपाध्यक्ष प्रदीपकुमार नांद्रे, संचालक उमाकांत बिरारीस, अनिल शिंदे, दिनेश सोनवणे, विजय बागुल, विश्वास पदमोर, संध्याताई अकलाडे, विमलबाई अहिरराव, अबूअली पिंजारी, विलास देसले, उल्केश देसले, माणिक मारणर उपस्थित होते. व्यवस्थापक दिपक साळुंके यांनी मागील वर्षातील आर्थिक ताळेबंद तसेच संस्थेच्या विविध उपक्रमांचा अहवाल सभेत सादर केला.

यावेळी धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक तथा युवा नेते हर्षवर्धन दहिते यांच्या ठरावाला एकमुखी पाठिंबा देऊन ठराव मंजूर केला. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना दिलीप काकुस्ते यांनी सांगितले की, शेतकऱ्यांचे हित आणि संस्थेचा पारदर्शक कारभार हीच शेतकी संघाची मुख्य ध्येयधोरणे आहेत. सभासदांच्या विश्वासाच्या बळावरच युवा नेते हर्षवर्धन दहिते यांच्या मार्गदर्शनाखालील संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. असे गौरवोद्गार काढलेत.

श्री पांझरा कान सहकारी साखर कारखाना चे माजी अध्यक्ष त्र्यंबक भामरे, जि प सदस्य विजय ठाकरे, साक्री तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भानुदास गांगुर्डे, रयत क्रांती संघटना चे जिल्हाध्यक्ष विलास भदाणे, भू विकास बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर पाटील, धुळे जिल्हा मजूर फेडरेशन चे उपाध्यक्ष देविदास पाटील, धुळे जिल्हा धनगर समाज संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष रमेश सरक, उत्पल नांद्रे, कावठे चे गटनेते सुभाष बोरसे, भरत अहिरराव, प्रा रवींद्र ठाकरे, मुकुंद घरटे, नंदकुमार खैरनार, भानुदास भदाणे, महेंद्र देसले, चंद्रकांत पवार, नगरसेवक दीपक वाघ, विनोदकुमार पगारिया, राहुल अहिरराव, मुन्ना देवरे, प्रवीण देवरे, सागर काकुस्ते, हर्षल विरारीस, अतुल दहिते यांच्या सह शेतकी संघाचे संचालक मंडळ व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक व विषय वाचन व्यवस्थापक दीपक साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन विजय भोसले व आभार प्रदर्शन उपाध्यक्ष प्रदीपकुमार नांद्रे यांनी केले. सभेच्या यशस्वीतेसाठी संजय घरटे, बाळा ठाकरे, संजय भोसले, शिवाजी धनगर यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सभेच्या अखेरीस राष्ट्रगीताने सांगता झाली. वार्षिक सभेला तालुक्यातील शेतकरी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जातीय-धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या

शिवीगाळ व असभ्य भाषा वापरून समाजाबाबत गैरसमज निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी पार्वती परशुराम जोगी, नीलू पार्वती जोगी, अलका पार्वती जोगी, स्वरा पार्वती जोगी, साक्षी पार्वती जोगी, रूपाली पार्वती जोगी, वर्षा पार्वती जोगी, नेहा निलू जोगी, जानवी अलका जोगी, बबीता स्वरा जोगी, रुकसार निलू जोगी, ज्योत्सना निलू जोगी, काजल किरण जोगी, तनु जोगी, सावित्री दुर्गा जोगी, सुनिता निलू जोगी, दिपाली अलका जोगी, रोहिणी जानवी जोगी, काजल किरण जोगी, शनाया स्वरा जोगी, आधी उपस्थित होते

## शासकीय कार्यालया बाहेरील वाळूच्या

अजय भगवान भिल (वय २०, रा. अलाणे ता. शिंदखेडा) निष्पन्न झाले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेत अटक केली. ४ लाखांचे ट्रॅक्टर, ५० हजारांची ट्रॉली असा साडेचार लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला. शासकीय आवारातुन वाळुने भरलेले ट्रॅक्टर चोरी करणारे दोघांना अटक केली. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक भामरे हवालदार गणेश सोनवणे, प्रशांत पवार, कैलास चौधरी, रुपेश चौधरी, कमलेश कोठावदे, चेतन माळी यांनी कारवाई केली.

पान १ वरुन

## कर्जमुक्ती योजनेत जिल्ह्यातील तीन हजार दोनशे

टप्प्याटप्प्याने लाभ देण्यात येत आहे. यापूर्वी सुमारे १२.५८ लाख पात्र लाभार्थ्यांच्या कर्जखात्यांवर १०,११५ कोटींची रक्कम थेट वर्ग करण्यात आली होती. आता पुढील टप्प्यात ३ लाख २७ हजार २५० शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर ३,१६०.४४ कोटींचा लाभ देण्यात आला आहे. त्यामुळे आतापर्यंत राज्यातील एकूण १५ लाख ८५ हजार ४९३ कर्जखात्यांवर १३,२७५.४५ कोटींचा लाभ वितरित झाला आहे.

नाशिक विभागालाही या योजनेचा मोठा लाभ मिळाला आहे. विभागातील सुमारे २.४८ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर २,१७४ कोटींची रक्कम वर्ग करण्यात आली असून, त्यामध्ये धुळे जिल्ह्यातील ३,२५८ शेतकऱ्यांना ३३.०१ कोटींचा लाभ मिळाला आहे. कर्जमुक्तीमुळे संबंधित शेतकऱ्यांचा थकीत कर्जाचा भार कमी होऊन पुढील पीक हंगामासाठी आर्थिक नियोजन करणे अधिक सुलभ होईल, असे पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले.

धुळे जिल्ह्यात सहकारी बँकिंग व्यवस्थेतूनही या योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू असल्याचे सांगताना श्री. रावल म्हणाले की, धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात ३,५९६ कर्जखात्यांना ३२.१४ कोटी, दुसऱ्या टप्प्यात १,५९५ कर्जखात्यांना १४.२१ कोटी आणि तिसऱ्या टप्प्यात २०३ कर्जखात्यांना १.७९ कोटी, असा एकूण ५,३९४ कर्जखात्यांना ४८.१३ कोटींचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

कर्जमुक्तीचा लाभ हा केवळ जुन्या कर्जाच्या ओझ्यातून बाहेर पडण्यापुरता मर्यादित राहू नये, तर शेतकऱ्याला नव्या हंगामासाठी पुन्हा आर्थिक बळ मिळावे, ही शासनाची भूमिका असल्याचे श्री. रावल यांनी स्पष्ट केले. त्यासाठी कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नवीन पीक कर्ज वाटप करण्याचे निर्देश सर्व बँकांना देण्यात आले आहेत. तसेच प्रसिद्ध झालेल्या पात्र यादीत नाव असूनही ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आधार प्रमाणीकरण केलेले नाही, त्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर योजनेच्या निकषानुसार पात्र लाभाची रक्कम थेट संबंधित कर्जखात्यात जमा करण्यात येणार आहे. धुळे जिल्ह्यातील एकही पात्र शेतकरी केवळ आधार प्रमाणीकरण प्रलंबित असल्यामुळे या लाभापासून वंचित राहू नये, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

## मुख्य निवडणुक आयुक्त ज्ञानेश कुमारांना पदावरून

संबंधित असल्याने ती पारदर्शक आणि विकेंद्रित पद्धतीने राबविणे आवश्यक आहे, अशी भूमिका निवेदनकर्त्यांनी मांडली आहे. मतदारांच्या माहितीच्या डेटाबेसचे केंद्रीकरण आणि मतदारसंघ पातळीवरील वैधानिक अधिकाऱ्यांच्या अधिकारांबाबतही निवेदनात प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. निवेदनातील प्रमुख मागण्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवावे. एसआयआर प्रक्रिया तातडीने थांबवावी. चुकीच्या पद्धतीने मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या सर्व नागरिकांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करावेत. निवडणूक आयोगाचे स्वतंत्र, पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीचे कामकाज पुनर्स्थापित करावे. विद्यमान निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची पद्धत बदलून सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या निवड समितीच्या धर्तीवर नियुक्तीची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या समितीत पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असावा, अशी मागणी निवेदनात आहे. निवेदनावर कॉ. एल.आर. राव, कॉ. दीपक सोनवणे, हरिश्चंद्र लोंढे, प्रा. बाबा हातेकर, कॉ. राजेंद्र चौरे, कॉ. आसिफ शेख, कॉ. पोपटराव चौधरी, कॉ. वसंतराव पाटील, कॉ. साहेबराव पाटील, कॉ. हिरालाल परदेशी, कॉ. सिद्धार्थ जगदेव, कॉ. सिद्धांत बागुल, अतुल सोनवणे, युवराज करनकाळ, साबीर शेख, डॉ. गिरासे, ॲड. जफर शेख, हितेंद्र पवार, डॉ. जितेंद्र मराठे, रमेश दाणे, नाजनीन शेख यांच्यासह विविध पक्ष व संघटनांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत.


**CHANGE OF NAME**

I have Change
My Old Name From
**SHAKILA BANO BINTE NISAR AHMAD**
To My New Name
**SHAKILA BANO MOHAMMAD SALEEM ANSARI**
as per Documents
**ADD- PLOT NO.2259-2, GALLI NO.7, KASAB BADA MASJID TASA GALLI, DHULE**

**CHANGE OF NAME**

I have Change
My Old Name From
**MIRZA SAMREEN ALI BEG**
To My New Name
**SAMREEN KHAN AKRAM KHAN**
as per Documents
**ADD- PLOT NO.13, HAZAR KHOLI RAHEMAT PARK, DHULE**

**CHANGE OF NAME**

I have Change
My Old Name From
**QAZI JAWEED HUSAIN DILNAWAZ**
To My New Name
**QUAZI JAWEED HUSAIN DILNAWAZ**
as per Documents
**ADD- 43, CHALISGAON ROAD INFRONT ALISHA KIRANA GARIB NAWAZ NAGAR, DHULE**

**CHANGE OF NAME**

I have Change
My Old Name From
**QAZI SHAESTA PARVIN JAWEED HUSAIN**
To My New Name
**QUAZI SHAESTA BANO JAWEED HUSAIN**
as per Documents
**ADD- 43, CHALISGAON ROAD INFRONT ALISHA KIRANA GARIB NAWAZ NAGAR, DHULE**


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बॅंका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे तरवाडे ता. जि. धुळे येथील गट नं.२५७/१/अ चे एकुण क्षेत्र २ हे, २० आर अशी शेत जमीन यापैकी लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेला क्षेत्र ८० आर भारतीय राष्ट्रीय महामार्गला लगत अशी शेत जमीन. त्याची चतु:सिमा नकाशा रेकॉर्डप्रमाणे.**

सदर सविस्तर नमूद केलेली मिळकत ही लिलाबाई रामदास मोरे, वगैरे रा. मु.पो.तरवाडे, ता.जि.धुळे. याचे नावे व कब्जे ताबेउपभोगात आहे. सदर शेत जमीन खरेदी घेण्याचा व्यवहार आमचे पक्षकार इम्रान शेख शब्बीर, रा. पोलिस स्टेशन जवळ नवेगाव, मेहणबारे, जळगांव. यांनी शेतजमीन मालकांशी व्यवहार केलेला असून त्याबाबतची बयाणा देखील दिलेला आहे. व त्याचप्रमाणे आमचे पक्षकार हे लवकरच खरेदीखत देखील नोंदविणार आहे.

**तरी सर्वाना या जाहीर नोटीसणे कळविण्यात येते की,** सदर शेत जमीन सबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, साबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपटटा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच, वा वारस हक्क, खावटी दृ म.जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे (१५) पंधरा दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्राची प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राहय धरण्यात येणार नाही. व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणुन खरेदी करतील. नंतर आलेल्या हरकती हया ग्राहय धरल्या जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटस असे. धुळे दि. ०१/१०/२०२६

**ॲड.परवेज निसार तांबोळी** मो. ७०२०३८१३९४
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना विशेष करून रूलअमीन नुरूद्दीन शेख रा. गरीब नवाज नगर, धुळे. यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील ७/१२ उतारा प्रमाणे:-स. नं. ४३८/१ व ४३६/१अ पैकी प्लॉट नं. २०८, चे एकुण क्षेत्र ५५ चौ. मी. बांधीव घर, संडास, बाथरूम, नळ कनेक्शन, वीज कनेक्शनसह अशी मिळकत त्यांची चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे.

वर नमुद मिळकतीचे मालक आमचे पक्षकार **अशफाक बेग अदल बेग,** रा. ग. नं.२, तैबा मस्जिद जवळ, देवपुर,धुळे, ता. जि. धुळे. यांची मालकी हक्कातील व ताबे उपभोगातील असून त्यांनी **रूलअमीन नुरूद्दीन शेख** रा. गरीब नवाज नगर, धुळे. यांच्याशी दि.१६/०९/२०२६ रोजी नोटरी सौदा पावती वरून सौदा पावती साक्षीदारांसमक्ष केलेली होती व आहे. त्याचा नोटरी नं.६०८/२०२६ असा आहे मात्र काही व्यवहाराबाबत आर्थिक अडचण निर्माण झालेली असल्याने सदरच्या सौदा पावतीनुसार पुढील व्यवहार पूर्ण करू शकत नाही. त्यामुळे त्यांनी एकमेकांना सदरची बाब लक्षात आणून दिली व दि.१६/०९/२०२६ रोजीचा सौदा पावती वरून सौदा पावतीचा सौदा आमचे पक्षकार यांनी सदरचा सौदा रद्दबातल केलेला आहे.

सबब जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत नामे रुलअमीन नुरूद्दीन शेख यांच्याशी कोणीही सौदे करार, भरणा पावती, विक्री व्यवहार, करू नये, केल्यास तो आमचे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच आज पासून आमचे पक्षकार हे वर नमुद मिळकतीचा सौदा व व्यवहार दुसरा व्यक्तीशी करण्यास मोकळे झाले आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. धुळे.दि.३०/०९/२०२६

**ॲड.परवेज निसार तांबोळी** मो. ७०२०३८१३९४
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे

## तिव्र दुष्काळामुळे शेतकरी संकटात

(पान १ वरून) तसेच फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये खरीप हंगामातील उत्पादन १५ ते २० टक्क्यांपर्यंतच मर्यादित राहण्याची शक्यता असून, काही ठिकाणी २५ टक्के उत्पादनही हाती येणे कठीण झाले आहे. धुळे तालुक्यात ८६ टक्के, साक्रीत १०५ टक्के, शिंदखेड्यात ८९ टक्के, तर शिरपूर तालुक्यात ९०.८० टक्के पाऊस झाल्याची नोंद आहे. मात्र, प्रत्यक्षात शेतातील पिकांची स्थिती पाहता ही आकडेवारी वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचा दावा पक्षाने केला आहे. एखाद्या महसूल मंडळात जास्त पाऊस झाला म्हणून संपूर्ण तालुक्याचे पर्जन्यमान त्यानुसार गृहीत धरू नये, अशी मागणीही करण्यात आली.

दरम्यान, ३० सप्टेंबर रोजी आमदार रोहित पवार यांनी धुळे जिल्ह्यातील विविध गावांचा दुष्काळ पाहणी दौरा केला.

याशिवाय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क १०० टक्के माफ करावे, वीजपुरवठा सुरळीत करावा, ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, जलयुक्त शिवार योजना पारदर्शकपणे राबवावी, तसेच पाझर तलाव आणि धरणांमधील गाळ काढण्यासाठी वाहतूक व जेसीबी यंत्राच्या खर्चाकरिता अनुदान द्यावे, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे. या सर्व मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष जितेंद्र उत्तमराव मराठे, धुळे शहर जिल्हाध्यक्ष नंदू येलमामे, महिला जिल्हाध्यक्ष गायत्री पाटील, स्मिता खैरनार, डी. टी. पाटील, व्यंकटेश पाटील, डॉ. कुणाल पाटील, रुबाब पिंजारी, गिरीश नेरकर, सयाजी ठाकरे, गुलाबराव पाटील, चंद्रकांत पाटील, सरोजिनी गायकवाड, दिलीप पवार, वाल्मीक मराठे, यशवंत पाटील, शेख अमीन, दिलीप भाईदास पाटील, मोहन कोळी, किशोर पाटील, संदीप भामरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी दिला आहे.

### प्रकाश में आज- धरम अधिकारी




दिलीप कुमार श्रीदेवी जितेन्द्र शक्ती कपूर प्राण कादर खान असराणी


TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता.२७ से रोज २ खेल टा. ३,६ बजे
हनुमान अंश (हिंदी)
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता.२७ से रोज १ खेल टा. ९ बजे
द व्वान - फोर्स ऑफ द फॉरेस्ट (हिंदी)
bookmyshow
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




दि. २ से ४ खेल टा.
१२, ३, ६, ९ बजे
9422789999/ 9823177599 Jyoticinemadhule.
bookmyshow


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधिताना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील महानगरपालिका हदीतील.

७/१२ उताराप्रमाणे :- स. नं. ४३६/१ब+२+३ पैकी प्लॉट नं. ४३४ चे एकूण क्षेत्र २६६.०० चौ. मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र ६५.०० चौ. मी. बखळ प्लॉट.

सि.स. उताराप्रमाणे :- सि. स. नं.१८१०८ चे एकूण क्षेत्र २९०.९० चौ. मी. यापैकी पुर्वेकडील भागाचे क्षेत्र ६५.०० चौ. मी. (प्रत्यक्ष जागेवर क्षेत्र ५७.५० चौ. मी.) बखळ प्लॉट हे १) मुश्ताक अहमद हाजी हारून शाह २) रईस अहमद हाजी हारून शाह, दोघे रा.ग.नं.७,मोगलाई,धुळे याच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे.

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदापावती, कोर्ट कचेरी बक्षीसपत्र, गहाण, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणेप्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरून, माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दिनांक :- ०१/१०/२०२६

**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे
मो.९८८१९२९४२४ (नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)




## बारा ऑक्टोबरला डाक अदालत

धुळे, दि. १- नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे आणि शासकीय सेवा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात, या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या सेवा संकल्प अभियानांतर्गत धुळे डाक विभागात सोमवार, दि. १२ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मासिक डाक अदालतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती धुळे डाकघर विभागाचे प्रवर अधीक्षक एस. बी. ताठे यांनी दिली आहे.

डाक अदालतीत टपाल, स्पीड पोस्ट, काउंटर सेवा, पार्सल, बचत बँक खाते आणि मनीऑर्डर आदी सेवांशी संबंधित तक्रारींची दखल घेतली जाणार आहे. तक्रार सादर करताना संबंधित नागरिकांनी तक्रारीचा संपूर्ण तपशील नमूद करावा. यामध्ये मूळ तक्रार केल्याची तारीख, ती ज्या अधिकाऱ्याकडे पाठविली त्यांचे नाव व पदनाम तसेच तक्रार पाठविल्याचा आवश्यक तपशील समाविष्ट असावा.

नागरिकांनी आपल्या तक्रारी प्रवर अधीक्षक डाकघर, धुळे विभाग, धुळे४२४००१ या पत्त्यावर अतिरिक्त प्रतीसह दि. ९ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत अथवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पद्धतीने पाठवाव्यात.प्रलंबित तक्रारींना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या या डाक अदालतीचा संबंधित नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवर अधीक्षक श्री. ताठे यांनी केले आहे.

## गोदावरी विद्यालयाचे मैदानी स्पर्धेत यश

म्हसावद,दि.२९(प्रतिनिधी)- क्रीडा व युवक सेना संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रिडाअधिकारी कार्यालय नंदुरबार यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या शहादा तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत म्हसावद येथील प.पू. सती गोदावरी माता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून जिल्हास्तरीय स्पर्धेत पात्र झाले आहेत.

यात १७ वर्षे वयोगटातील प्रथम रविना रुपसिंग रावताळे भाला फेक, द्वितीय विशाल राठोड गोळा फेक, मयूर राठोड द्वितीय ८०० मीटर धावणे. १९ वयोगटात २०० मीटर धावणे शालिनी सुरेश पटले हिने प्रथम क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल विद्यालयाचे चेअरमन संजय धारूभाई पाटील, व्हाईस चेअरमन रमाकांत चौधरी, सचिव प्रसन्नकुमार बंब, संचालक मंडळ, प्राचार्या पुष्पा पटेल यांनी अभिनंदन केले. तसेच क्रीडा शिक्षक गौरव राजपूत आणि रवींद्र बैसाणे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

## दुरुस्ती

बुधवार दि. ३०/९/२०२६ रोजी दै. आपला महाराष्ट्र मध्ये **ॲड. रोहित राजकुमार छाबिडया** यांचे नोटीसीत मौजे धुळे येथील स. नं. १३९२ तसेच मिळकतीचे मालक **मंगला अरुण साळुंखे** असे अनावधानाने प्रसिद्ध झाले असून त्याऐवजी **सि. स. नं. १३९२ व मिळकतीचे मालक मंगला अरुण साळुंके** असे वाचावे.

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY OLD NAME FROM **JUNID AHMAD EJAZ AHMAD QURESHI** TO **QURESHI JUNAID EJAZ**

ADD- VADJAI ROAD NEAR AKBAR GARDAN MILLAT NAGAR, DHULE.

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY OLD NAME FROM **SHAHIN BANO** TO **QURESHI SHAHIN EJAZ**

ADD- VADJAI ROAD NEAR AKBAR GARDAN MILLAT NAGAR, DHULE.

**NAME CHANGE**

I HAVE CHANGE MY NAME FROM **AARIF KHA IBRAHEEM KHA** TO **AARIF KHAN IBRAHEEM KHAN**

ADD- AAGRA ROAD, NOOR MASJID, VITA BHATTI, DEVPUR, DHULE-424002.

## शिरपूर वरवाडे नगरपरिषद

ता.शिरपूर, जि.धुळे, पिन- ४२५४०५

E-mail Id:-shirpurnagarparishad@gmail.com

Phone No - ०२५६३/२५५०४२/२५५७४२

जा.क्र/२६६३/पा.पु.विभाग/२०२६-२०२७ दि.०९/१०/२०२६

### जाहिर निविदा सूचना

म.मुख्याधिकारी, शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर जि.धुळे जि.धुळे द्वि-लिफाफा पद्धतीने पात्र कंत्राटदार/मक्तेदार/पुरवठाधार/विक्रते आदी. कडून खालील कामाकरिता निविदा मागवीत आहे. को-या निविदा फॉर्म सदर निविदा प्रसिद्धी झालेपासून ७ दिवसाच्या आत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत प्रसिद्धी दिनांकापासून ते दि. १३/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क न.प.ने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | को-या निविदा फॉर्म किंमत (रु.) | बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | पाणीपुरवठा विभागास दैनंदिन पाईपलाईन लिकेज दुरुस्तीसाठी आवश्यक फिटिंग साहित्य खरेदी करणे. | ५००/- | १०,०००/- |

(प्रशांत सरोदे) मुख्याधिकारी — (श्री.चिंतनभाई पटेल) नगराध्यक्ष

शिरपूर वरवाडे नगरपरिषद, शिरपूर जि.धुळे

## दै.आपला महाराष्ट्रच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा

### श्री महेश को-ऑप. बँक लि., नाशिक

कें द्र कार्यालय : ३२२, ३रा मजला, सारडा संकुल, एम.जी.रोड, नाशिक ४२२००१.
फोन नं.: (०२५३) २३१४५७० Email ID: ho@mahesh.bank.in -
Website: www.mahesh.bank.in

✻ बँकेच्या आकर्षक कर्ज योजना ✻

| गृह कर्ज | वाहन कर्ज | सोनेतारण कर्ज | वेअरहाऊस कर्ज | शैक्षणिक कर्ज |
|---|---|---|---|---|
| ९%* | ९%* | ९.५०%* | १०% | ११% |

इतर कर्ज ९% ते १४% तसेच सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा त्वरीत उपलब्ध
(अटी व शर्ती लागू)

✻ आधुनिक तंत्रज्ञानाच्या सर्व सेवा व सुविधा उपलब्ध ✻

✻ मोबाईल बँकींग - UPI / IMPS / NEFT / RTGS / ATM Cum Debit Card / POS / Ecom / S.M.S. / Missed Call / Core Banking.

✻ सर्व प्रकारचा कर भरणा तसेच पंचवटी शाखेत लॉकर्स सुविधा.

✻ सर्व प्रकारच्या ठेवींवर आकर्षक व्याजदर (४.००% ते ८.००%).

✻ शाखापरिवार ✻

✻ मुख्य शाखा ✻ (०२५३) २३१४५४२
✻ सिन्नर शाखा ✻ (०२५५१) २२१००५
✻ पंचवटी शाखा ✻ (०२५३) २५१००११
✻ नाशिकरोड शाखा ✻ (०२५३) २४५१८९०
✻ जळगाव शाखा ✻ (०२५७) २२३३३११
✻ मालेगाव शाखा ✻ (०२५५४) २२१२९९
✻ सिडको शाखा ✻ (०२५३) २३९४५४२

✻ संचालक मंडळ ✻

सीए. विष्णुकांत मंत्री, अध्यक्ष — सीए. सचिन झंवर, उपाध्यक्ष
श्री.बालकिसन धुत, मानद कार्यकारी संचालक — श्री.देवेंद्र भुतडा, जनसंपर्क संचालक — सीए.श्री.अशोक झंवर (संस्थापक अध्यक्ष)
सीए. रामनारायण कलंत्री, ॲड.नंदकिशोर लाहोटी, ॲड.पुरुषोत्तम तापडे, सीए. शुभम मंत्री
ॲड.सर्वार्थबुब, सौ. श्यामा केला, सौ.रत्ना तापडीया, श्री.विकास साळवे, श्री.गणेश सोनवणे
बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य: श्री.ललित बुब, श्री.दुर्गाप्रसाद जाजु, श्री.सुरज धुत
श्री.भास्कर शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी व सेवक वृंद

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँक, पतसंस्था, खाजगी सावकार व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसिने कळविण्यात येते कि, मोहाडी प्र. ल. ता. जी. धुळे येथील गट क्रमांक व उपविभाग १०१/२ पैकी प्लॉट न.११ चे एकूण क्षेत्र ५०२.९३ चौरस मीटर यापैकी दक्षिणेकडील क्षेत्र १७१ चौ.मी. (म्हणजेच १८३९.९६ चौ. फुट) ज्याची लांबी १९ मिटर आणि रूंदी ९ मीटर म्हणजेच (लांबी ६२.३२ फुट आणि रूंदी - २९.५२ फुट) वर असलेले बखळ प्लॉट मिळकत सदर मिळकतीच्या चातुर्सिमाः- पूर्वेस- प्लॉट न. १२, पश्चिमेस- १२ मीटर रोड, दक्षिणेस- प्लॉट न. १०, उत्तरेस- याच प्लॉटचे उर्वरित क्षेत्र येणेप्रमाणे वरील जमीनीचे हल्ली कब्जेदार व मालक जबिहुल्लाह बैतुल्लाह खान, नसरीन अब्दुल्लाह खान, सामिउल्लाह बैतुल्लाह खान यांनी त्यांचे समीक मिळकतीचे वन नमूद क्षेत्र आमचे अशील यांचेसोबत कायम विक्रीचा सौदा केला आहे, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

सदर मिळकतीचे बाबत कोणाचे काही हक्क, हित संबंध, तारण गहाणखत, सौदा पावती, बोजा, मुखत्यारपत्र, प्रोमिसरी नोट, लीज, लीन, वारस हक्क, खावटी अर्ज, मे. कोर्टाचा मनाई हुकूम इतर काही हक्क, हित संबंध अगर तक्रार असल्यास आवश्यक त्या मूळ कागदपत्रांसोबत सदर आपली लेखी हरकत ७ दिवसाच्या आत नोटीस प्रसिद्धी पासून खालील दिलेल्या पत्त्यावर कळवावे मुदतीनंतर आलेल्या हरकती तसेच परस्पर वर्तमान पत्रातून घेतलेल्या हरकती आमचे अशीलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही व आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगितलेवरून त्यांच्यातर्फे आमचे मार्फत प्रसिद्धिस दिली असे कळावे.

धुळे दिनांक-०१/१०/२०२६

**ॲड.नवीद एस. शाह** मो. ९१५६०२२५६८
आफिस : प्लॉट नं. १४अ, हिरेभवन समोर, जिल्हा न्यायालयाजवळ, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस बँकांना हित संबंधितांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन ७/१२ उताऱ्या प्रमाणे **मौजे दह्याणे ता.जि.धुळे येथील गट नं. ८३/३ चे एकुण क्षेत्र. ला. ला. १ हे. १९ आर, पो.ख.० हे. ०० आर, एकुण १ हे. १९ आर, आकार रूपये. २.२० पैसे असून गट नं.१०६/२/ब वरून गट नं. ८३/३ ला पाणी घेण्याचा हक्क राहील. तसेच इले. मोटार, इले. कनेक्शन व पाईप लाईन वरील हक्कासह यांसी चर्तुसिमा पुर्वेस - गट नं. ८३/१, पश्चिमेस - गट नं. ९१, दक्षिणेस - गट नं.८५, उत्तरेस - गट नं. ८३/२**

येणेप्रमाणे वर्णन असलेली शेतजमीन ही १) मनिषा संतोष राजपुत, २) संतोष अंबरसिंग राजपुत (तवर) रा. बाबरे ता.जि.धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील असून सदर शेतजमीन ही आमचे पक्षकार यांच्याशी खरेदीखताचा सौदा केला आहे. या शेतजमीनीचा कायम खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार पुर्ण करणार आहेत.

तरी सर्वांना या जाहिर नोटीशी द्वारे कळविण्यात येते की, सदर शेतजमीनी संदर्भात कोणाचीही कुठलीही प्रकारे सौदा पावती, हक्क, हितसंबंध, देणे घेणे, माहिती हक्क, भाडेपट्टा व लिज, ताबा, गहाण, बोजा, कर्ज, टांच, व वारसा हक्क, खावटी, ज.मु., वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याच्या ८ दिवसाच्या आत योग्य त्या कागदपत्रांच्या प्रतिसहीत आमच्याकडे हरकती सादर कराव्यात. परस्पर हरकत जाहीर नोटीस वर्तमान पत्रात आल्यास त्या ग्राहय धरण्यात येणार नाही. व हरकती न आल्यास आमचे पक्षकार सदर शेतजमीन ही निर्बोज म्हणुन खरेदी करतील. नंतर आलेल्या हरकती या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. सदर जाहीर नोटीस आमच्या पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रांवरून आमच्या मार्फत प्रसिद्ध करण्यात आले आहे.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस असे. धुळे दिनांक ३०/०९/२०२७

**ॲड.एन. आर. रणधीर** (नोटरी भारत सरकार)
गरुड कॉम्प्लेक्स, कमलाबाई शाळेसमोर, धुळे मो. ९५८८६८९५३०

## जाहीर नोटीस

ॲड. विशाल अंबादास वाघ
मो.नं. ९८९०९५८९४९

### धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. सो. वर्ग १ धुळे यांचे कोर्टात

फौ.कि.अर्ज नं ७७९/२०२६

**दिलीप किसन पाटील** उ. व. : ६१ वर्ष, कामधंदा :- मजुरी
रा.:-गुरूगणेश मंदिर, मु. पो. मोराणे
प्र. लळींग, ता. जि. धुळे. .... अर्जदार

विरूद्ध

**म. निबंधक सो.,**
**ग्रामपंचायत कार्यालय,**
**मोहाडीप्र.डांगरी,ता.जि.धुळे** ...सामनेवाला

**(कासुबाई उत्तम पाटील यांचा मृत्यु दि.१२/१२/१९६८)**

ज्याअर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग १ सो. धुळे दि.१७/०९/२०२६ रोजी फौ. कि. अर्ज. नं. ७७९/२०२६ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने मृत्यु व मृत्यु नोंद अधिनियम (सुधारित) २०२६ चे कलम १३ (३अ) अन्वये अर्ज प्रमाणे कासुबाई उत्तम पाटील यांच्या मृत्युची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि.३०/१०/२०२६ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. १ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस व तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणा-या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे दिनांक :- ३०/०९/२०२६

सही... **कामगिरी कारकुन** फौजदारी न्यायालय, सो. कोर्ट नं. १ धुळे

(कोर्टाचा शिक्का)

सही... **सहा. अधिक्षक** सह.फौजदारी न्यायालय,सो. कोर्ट नं. १, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मिळकत वर्णन- मौजे तु.जि.धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे धुळे येथील सर्व्हे नंबर ५७९-४अ, यात असलेल्या लालबहादुर शास्त्री गृह निर्माण सोसायटी लि., धुळे मधील प्लॉट क्रं. ३९, विस्तारीत सि. स. नं. ५७४ चे एकुण क्षेत्र २२३.२० चौ. मी. पैकी क्षेत्र २१८.७५ चौ. मी. यांस चतुःसिमा पूर्वेस - प्लॉट नं. ४२, पश्चिमेस - ६ मीटर रस्ता, उत्तरेस- प्लॉट नं. ३८, दक्षिणेस - प्लॉट नं. ७७ व ७५ आणि तसेच सर्व्हे नंबर ५७९ - ४अ पैकी प्लॉट क्रं. ८३ चे एकुण क्षेत्र १५७ चौ. मी., त्याचा विस्तारीत सि. स. नं. ५८० चे एकुण क्षेत्र १८१.५० चौ. मी. पैकी पुर्वेकडील क्षेत्र ३३.९६ चौ. मी. यांस चतुःसीमा पूर्वेस-प्लॉट नं. ३९, पश्चिमेस-प्लॉट नं. ८३ चा भाग, उत्तरेस-६ मी. रस्ता, दक्षिणेस-प्लॉट नं. ७९ प्रमाणे येणे प्रमाणे वर्णनाच्या मिळकतीचे नविन धारक/पट्टेदार/मालक श्री. तुषार शिरीष दोडे रा. ह. मु. रा. ए-१, उत्कर्ष चौक, वाकड, पुणे, ता. जि. पुणे, सौ. निलीमा योगेश कासार रा. गणपती रोड, जैन मंदीर जवळ, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार, श्री. विनोद शिरीष दोडे, रा. प्लॉट नं.३९, गोळीबार टेकडी रोड, नवजिवन ब्लड बॅक जवळ, शास्त्री नगर, धुळे, ता. जि. धुळे यांचे ताबेउपभोगातील व मालकीची असून त्यांनी सदरहू त्यांचे ताबेउपभोगातील वर नमूद दोन्ही मिळकती कायमस्वरूपी विकणेचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे व सौदापोटी रक्कम स्विकारली आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बॅका व इतर कोणाचाही खाजगी हक्क अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा करार, मुखत्यार, मृत्युपत्र वगैरे कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत खालील नमुद पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरूपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. रजि. पोस्टाने दिलेली हरकत नोटीस, तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत काणाची काहीही एक हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहीतीवरून व सांगणेप्रमाणे आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे. ठिकाण - धुळे दिनांक - ०२/१०/२०२६

**ॲड.राहुल लक्ष्मीकांत येलमामे**
निवास : प्लॉट नं. ९, माधव कॉलनी, बडगुजर प्लॉट धुळे
ऑफिस : स्टेशन रोड, हिरे भवन समोर, ग. स. कॉलनी, धुळे
मो. ९९२२२९६४५६/९६६५६९६५९३

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तेसच सर्व बँका, पतपेढ्या, तथा इतर सर्व वित्तीय संस्थाना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** मौजे धुळे, तालुका जिल्हा धुळे येथील मौजे वलवाडी धुळे महानगरपालिका हदीत मधील सर्व्हे नंबर ६०/२अ पैकी, प्लॉट नंबर ३ चे एकूण क्षेत्र ३३४.५७ चौरस मीटर, ज्यासी विस्तारित सिटी सर्व्हे क्रमांक २८२२ चे एकूण क्षेत्र ३२५.०० चौरस मीटर, सत्ता प्रकारः क, तसेच सदर प्लॉटवर असलेले सुमारे ४६वर्ष जूने लोड बेअरिंग पद्धतीचे बांधिव घराचे क्षेत्र ५० चौरस मीटर यांसी चतुःसीमा पूढीप्रमाणे...

पूर्वेस : ३० फूटी रस्ता — पश्चिमेस : प्लॉट नंबर २
दक्षिणेस : २० फूटी रस्ता — उत्तरेस : सर्वे नंबर ६०/१

वर नमूद केलेली **मिळकत ही श्री. विजय भटा कापडणीस आणि सौ. सरला अरूण पाटील/कापडणीस रा. धुळे** यांच्या संयूक्त मालकीची व एकत्रित ताबे उपभोगातील मिळकत असून महसूल दप्तरी ७/१२ उता-यावर मालक व कब्जेदार सदरी त्यांची नावे लागलेली आहेत. सदर मिळकतधारक यांनी वर नमूद मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निजोखमी असल्याचा भरंवसा आमच्या पक्षकार यांना दिलेला आहे. त्याप्रमाणे सदर मिळकत खरेदी करण्यासाठीची बोलणी आमच्या पक्षकार यांनी मिळकतधारक यांच्याशी सुरू केलेली आहे आणि सदर मिळकत वर नमूद मिळकतधारक यांच्याकडून आमचे पक्षकार हे लवकरच खरेदी करणार आहेत.

सबब ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी, हितसंबंध, तसेच विक्री, अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, भाडेपट्टा, मृत्युपत्र, करार, कौटुंबिक तजवीज, हिंदु अन डिव्हायडेड फॅमिली, प्रतिपाळ, जप्ती, आरक्षण, किंवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी, अत्यंदान, उत्तराधिकार, बक्षिस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, सुविधाधिकार, विश्वस्त कब्जा, ताबा, तसेच कोणताही दावा, न्यायालयीन ओदश/हुकुमनामा, कंत्राट/करार, विकासननामा, देवाण-घेवाण, बेचेन-पत्र, कर्ज फिटेपर्यंत मिळकत ताब्यात ठेवण्याचा हक्क, हितभाग आणि/अथवा स्वारस्य असलेले पतदार, आणि/अथवा लेंडर, समाविष्ट असलेले किंवा नसलेल्या व्यक्तिंची संस्था, किंवा व्यक्तींची असोसिएशन, वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी, स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणत्याही प्रकारचा हक्क असेल तो किंवा ज्या कोणत्याही मागणीच्या स्वरूपातील वर नमूद मिळकती किंवा वर नमूद मिळकतीचा कोणताही भाग किंवा त्याच्या हीश्यासंबंधी कोणताही आक्षेप, असल्यास कृपया लेखी स्वरूपात पुष्ट्यर्थ सत्यप्रत कागदपत्रांसोबत निम्मलिखित स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत आक्षेप/हरकती नोंदवाव्यात.

सदरील मुदतीत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरील मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे तसेच सदरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी तो जाणीपुर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकत वर नमूद मिळकत धारक यांच्या कडून खरेदी करतील यांची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर मुदतीनंतर योणा-या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या तसेच कागदपत्रांशिवाय आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून तसेच दाखवलेल्या कागदपत्रावरून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

कळावे ही टायटल व्हेरिफिक्रेशन नोटीस असे. धुळे दि. :-१/१०/२०२६

**ॲड.विशाल शरद भट** मो. ९३२६१९८१७९
कार्यालय: ३८ जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवपूर ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. १११ व ११२अ पैकी प्लॉट नं. १४ चे क्षेत्र ५००० चौ. फुट यांस वि. सि. स. नं. ८७४६ चे एकूण क्षेत्र ४५९ चौ. मी. सत्ता प्रकार क यापैकी पुर्वेकडील भागाचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ३००० चौ. फुट व सि. स. उताऱ्याप्रमाणे २७३.२० चौ. मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : याच प्लॉट नं. १४ पैकी उर्वरित भाग, दक्षिणेस : प्लॉट नं. १५, उत्तरेस : रस्ता, येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत श्री. **भुषण भास्कर पाटकर,** रा. नाशिक यांचे मालकीची असून त्यांनी नमूद मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहू मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, आरक्षण इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मुळ दस्त जमा/ तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे. असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०१/१०/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा. बी/१२ भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे मो. ९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व संब्रंधितांना प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तु. जि. धुळे पो. तु. ता. शिरपूर पैकी मौजे गिधाडे येथील ग्रा. पं. हद्दीतील सर्व्हे २०७ पैकी प्लॉट क्र. २८ चे एकूण क्षेत्र १८० चौ. मी. ही मिळकत यासी चतु:सिमा.

पुर्वेस : गट नं. १९९/१
पश्चिमेस : रस्ता
दक्षिणेस : प्लॉट नं. २९
उत्तरेस : गट नं. २०७

येणेप्रमाणे चतु:सिमांकीत मिळकत ही प्रमिलाबाई बळीराम पाटील व रेखा प्रदीप पाटील यांच्या मालकीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील असून त्यांचेकडून आमचे अशिलांनी सदर मिळकत खरेदी करण्याचा सौदा केलेला असून त्याकामी पिरॅमल कॅपिटल ॲण्ड हाउसिंग फायनान्स लि. यांचेकडून कर्ज घेत आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीबाबत तारण, गहाण, लिज, जप्ती, भाडेपट्टा, सरकारी, निमसरकारी वैयक्तिक कर्ज, वारस, दावे फाटे, सौदा पावती इ. कोणत्याही स्वरुपाचा हितसंबंध असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील नमूद पत्त्यावर नमूद पत्त्यावर मुळ कागदापत्रांसह प्रत्यक्ष हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. विहीत मुदतीत कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची लेखी हरकत न आल्यास सदर वर नमूद मिळकत निर्वेध व निर्बोज समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकती, परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकती व तोंडी हरकती यांची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. तसेच ते आमचे अशिलांवर व वरील मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**नोटीस देणार : प्रमिलाबाई बळीराम पाटील, रेखा प्रदीप पाटील**

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती, दस्तऐवज अधिकारावरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे दि. ०१/१०/२०२६

**ॲड.सागर पी. सोनवणे**
४, शिव कॉलनी, मार्केट यार्ड,
पारोळा रोड, धुळे
मो. ९४२०३७३५३०

## दै.आपला महाराष्ट्रच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा



**पान १ वरुन**

## टायपिंग परीक्षेतील गैरप्रकारांचा पर्दाफाश

प्रत्यक्ष उमेदवारांची संख्या कमी असल्याचे निदर्शनास आले. परीक्षा सुरू असताना काही उमेदवार स्वतःची आसने आणि संगणक बदलत असल्याचेही आढळले. काही ठिकाणी आयटी शिक्षक मोबाईलच्या मदतीने उमेदवारांना वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवून देत असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, काही उमेदवारांनी आवश्यक आयडी आणि पासवर्ड न टाकताच परीक्षा सुरू केल्याचेही उघड झाले. या सर्व प्रकारांमुळे शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा

राज्यातील ११ परीक्षा केंद्रांवरील ९० संस्थांमध्ये अनियमितता आढळल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवण्याचा निर्णय राज्य परीक्षा परिषदेने घेतला आहे. परीक्षेतील पारदर्शकता कायम राखणे, संस्थाचालकांचा विश्वास टिकवणे आणि भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालणे, या उद्देशाने संबंधित विद्यार्थ्यांची पुन्हा परीक्षा घेण्यात येणार आहे. राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार बेडसे यांनी ही माहिती दिली. मात्र, फेरपरीक्षेची तारीख आणि वेळापत्रक याबाबतची सविस्तर माहिती अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

## दिवेआगर समुद्रात आठ मुलांचा मृत्यू

विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील आळंदी येथून सहलीसाठी आले होते. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. पुण्यातील आळंदी येथून ४२ विद्यार्थी आणि २ शिक्षकांचा समुह सहलीसाठी आले होते.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आळंदी येथील विनर्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची दिवेआगर येथे सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत ४२ विद्यार्थी आणि दोन शिक्षक, असे एकूण ४४ जण सहभागी झाले होते. त्यापैकी आठ विद्यार्थी समुद्र किनारी पाण्यात पोहण्याचा आनंद घेत असताना ही दुर्घटना घडली. या दुर्घटनेची माहिती मिळाल्यानंतर मंत्री भरत गोगावले आणि मंत्री आदिती तटकरे यांनीही प्रशासनाशी संपर्क साधल्याचे वृत्त आहे.

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचा संपर्क**

दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावरील दुर्घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून घटनेची सविस्तर माहिती घेतली. बचावकार्य आणि मदतकार्यावर तातडीने लक्ष ठेवण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. तसेच दुर्घटनेतील मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी दुःख व्यक्त केले असून आवश्यक ती मदत आणि कार्यवाही तातडीने करण्याचे निर्देश दिले. सहलीसाठी आनंदाने घराबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांवर काळाने घाला घातल्याने आळंदीसह रायगड जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे पर्यटनासाठी समुद्रकिनारी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## तपनभाई पटेल हॉस्पिटलमध्ये पद्मश्री डॉ. संजय ओक

झाला आहे. यापूर्वी अवघ्या दोन महिन्यांपूर्वी आयोजित करण्यात आलेल्या बालरोग शस्त्रक्रिया शिबिरात डॉ. संजय ओक व त्यांच्या टीमने बालकांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया केल्या होत्या. त्या शिबिराला मिळालेला प्रतिसाद आणि गरजू बालकांची वाढती संख्या लक्षात घेऊन यावेळी अधिक व्यापक स्वरूपात शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी १२० हून अधिक बालकांना शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या बालकांची रुग्णालयात मोफत वैद्यकीय तपासणी, निदान, आवश्यक चाचण्या आणि फिटनेस टेस्ट करण्यात आली. शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या बालरुग्णांचे दि. ३० सप्टेंबर पासून प्रवेश सुरू करण्यात येणार आहे.

**बालकासोबत पालकालाही मोफत सुविधा**

या संपूर्ण उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ शस्त्रक्रियाच नव्हे, तर गरजू कुटुंबांच्या इतर अडचणींचाही विचार करण्यात आला आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील बालरुग्णांना रुग्णालयापर्यंत आणण्यासाठी गावोगावी वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. बालरुग्णासोबत एका पालकालाही मोफत आणण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.रुग्णालयात दाखल झाल्यापासून डिस्चार्ज पर्यंत बालरुग्ण व पालकासाठी चहा-नाश्ता, भोजन, निवास आणि वैद्यकीय उपचारांची व्यवस्था पूर्णपणे मोफत करण्यात आली आहे.

**दर दोन महिन्यांनी मोफत शस्त्रक्रिया शिबिर**

उत्तर महाराष्ट्रासह मध्य प्रदेश आणि गुजरातच्या सीमावर्ती भागातील नागरिकांसाठी शिरपूर येथील तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर हे आरोग्यसेवेचे महत्त्वाचे केंद्र म्हणून कार्यरत आहे.

डॉ. संजय ओक यांची तज्ज्ञ सेवा, रुग्णालयाची वैद्यकीय सुविधा आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथकाची गावपातळीवरील कार्यतत्परता या तिन्हींच्या समन्वयातून हून अधिक बालकांना शस्त्रक्रियेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांना आपल्या मुलांच्या आरोग्याबाबत नवी आशा मिळाली आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या बालकांसाठी हा उपक्रम मोलाचा ठरणार असून, शिरपूरच्या आरोग्यसेवेतील सामाजिक बांधिलकीचे हे आणखी एक उदाहरण ठरत आहे.

## पोषण आहार गैरव्यवहार प्रकरणी

२३ जुलै २०२६ रोजी न्यायालयाने संबंधितांना अटकपूर्व जामीन मंजूर केल्याचे सांगण्यात आले आहे.

गुन्हा दाखल होऊनही संबंधित मुख्याध्यापकांवर अद्याप निलंबनाची कारवाई किंवा मुख्याध्यापक पदाची मान्यता रद्द का करण्यात आली नाही, असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. शिक्षण विभागाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित मुख्याध्यापकांवर निलंबनाची कारवाई करावी तसेच मुख्याध्यापक पदाची मान्यता रद्द करावी, अशी मागणी करण्यात आली.

संबंधित मुख्याध्यापकांवर पोषण आहार प्रकरणी गुन्हा दाखल असूनही अद्याप कारवाई झालेली नाही, असा आरोप करत आंदोलन करण्यात आले. तात्काळ निलंबनाची कारवाई न झाल्यास आगामी काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

आंदोलनावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे राज्य उपाध्यक्ष जाकीरमिया जहागीरदार, गफ्फार रहमान पिंजारी, करम अली सय्यद, मजहरोद्दीन शेख, हाजी असलम चौधरी, मुसाफिरमियाँ पिरजादे, अब्दुल सत्तार धोबी, अजीज गफ्फार पिंजारी, इसरार अहमद शेख, शाकीब पिंजारी, इजरार अहमद शेख, बिलालमियाँ जहागीरदार यांच्यासह शिष्टमंडळातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सायने येथील घरफोडीचा उलगडा; चोरटा अटकेत

ठेवलेले ३० हजार रुपये रोख, १४ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि २४ ग्रॅम चांदीचे तुकडे असा एकूण ६७ हजार रुपयांचा ऐवज चोरट्याने लंपास केला होता. ही घटना १९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते बारा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास धुळे जिल्हा गुन्हा अन्वेषण विभागाचे पथक करत असताना, गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीच्या आधारे सराईत गुन्हेगार प्रवीण सुभाष पाटील (वय ३४, रा. बिलवाडी, ता. जि. जळगाव) याला ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून चौकशी केली असता, त्याने सायने येथील घरफोडीची कबुली दिली. तसेच चोरी केलेला मुद्देमाल पोलिसांच्या स्वाधीन केला. तपासाअंती सोनगीर पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. कॉ. आर. एस. दराडे करत आहेत.

**पान १ वरुन**

## पोक्सो गुन्ह्यातील आरोपीला वीस वर्षे सश्रम

अन्वये वाढीव कलमे लावण्यात आली. तपासादरम्यान आरोपीविरुद्ध महत्त्वाचे पुरावे संकलित करून मुदतीत दोषारोपपत्र मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार यांच्या न्यायालयात सादर करण्यात आले.

सदर खटल्याची सुनावणी मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एच. सय्यद यांच्या न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे पीडित बालिका, तिचे पालक, वैद्यकीय अधिकारी, पंच तसेच तपास अधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण साक्षी नोंदविण्यात आल्या. उपलब्ध पुरावे व साक्षींच्या आधारे आरोपी अजय ऊर्फ निखील ताराचंद राठोड याच्याविरुद्ध गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायालयाने त्याला भारतीय न्याय संहिता कलम ६५(१) अन्वये २० वर्षे सश्रम कारावास व ५,००० रुपये दंड, कलम १३७(२) अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास व २,५०० रुपये दंड, तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ अन्वये २० वर्षे सश्रम कारावास व ५,००० रुपये दंड आणि कलम १२ अन्वये १ वर्ष सश्रम कारावास व १,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. अशा प्रकारे एकूण १३,५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. विजय सी. चव्हाण यांनी कामकाज पाहिले. मुख्य पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक योगिता राठोड, कोर्ट पैरवी अंमलदार पोलीस हेड कॉन्स्टेबल नितीन साचले, पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेंद्र गावीत, पोलीस हेड कॉन्स्टेबल शैलेंद्र जाधव, पोलीस कॉन्स्टेबल देवेंद्र पाडवी तसेच महिला पोलीस शिपाई दुर्गा वळवी यांनी कामकाज पाहिले. तपास अधिकारी व त्यांच्या पथकासह अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांच्या कामगिरीचे नंदुरबार जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी हणमंत गायकवाड आणि जिल्हा सरकारी वकील ॲड. व्ही. आर. गोसावी यांनी अभिनंदन केले.

## चोरीच्या दुचाकीवरील दोन्ही

क्र.एमएच २०/सीए- ७४१५) पाहणी केली असता, ही दुचाकी बुधवार, ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास कन्नड (जि. संभाजीनगर) येथील बस स्थानकाजवळील वाईन शॉपसमोरून चोरीला गेल्याची माहिती समोर आली. याबाबत दुचाकी मालक योगेश रामनाथ दाबके (रा. हतनूर, ता. कन्नड) यांनी कन्नड पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली आहे.चोरीच्या दुचाकीवरून प्रवास करणारे हे दोन्ही तरुण नेमके कोण होते, ते कुठून कुठे जात होते, याबाबतची ओळख अद्याप पटलेली नाही. याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद गुरुवारी उशिरापर्यंत झाली नसल्याची अधिकृत माहिती मिळाली आहे. मृत तरुणांची ओळख पटवण्यासाठी सोनगीर पोलीस सखोल तपास करत आहेत.

## एसआयआर प्रक्रिया थांबवून मतदारांचे हक्क पुनर्स्थापित करा

पुनर्स्थापित करावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या मागण्यांसाठी डावे आणि पुरोगामी पक्षांच्या वतीने देशव्यापी आंदोलनाचे आवाहन करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या तालुका कमिटीच्या वतीने हे निवेदन तहसीलदार संतोष डेरे यांच्याकडे सादर करण्यात आले. यावेळी नथू साळवे, वसंत दुबे, सुशिलाबाई भिल, सुपडू ठाकरे, अरुण रामराजे, भीमसिंह, अनिल सोनवणे, कन्हैया बिल यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## गुजराती समाजाची अकोल्यात ४ ता.बैठक; ॲड.संजीव वानी

येथील स्थानिक मान्यवर आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा महामंडळातर्फे सत्कार करण्यात येणार आहे. सभेच्या पूर्वसंध्येला शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी अकोला गुजराती समाजातर्फे महास्य संध्याफ या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला व कार्यक्रमाला तरुण-तरुणींनी आणि सर्व सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महामंडळाचे अध्यक्ष जयप्रकाश पारेख, उपाध्यक्ष मुकेश मेहता, सरचिटणीस राजेश शाह आणि चिटणीस ॲड. संजीव वानी यांनी केले आहे.

## बारा ऑक्टोंबरपर्यंत मनाई आदेश लागू

सुव्यवस्था राखणेबाबत योग्य तो निर्णयघेऊन परवानगी घ्यावी. तसेच लग्नकार्य किंवा प्रेतयात्रेच्या जमावास शासनाने वेळोवेळी दिलेले निर्बंध लागू असतील. हा आदेश २८ सप्टेंबर, २०२६ रोजीच्या मध्यरात्री १२.०१ वाजेपासून ते १२ ऑक्टोंबर, २०२६ रोजीच्या रात्री ११.५५ वाजेपर्यंत लागू राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# महार रेजिमेंटच्या स्थापना दिनी वीरमाता वीरपत्नींचा सन्मान; शहीदांना मानवंदना

**धुळे, दि.१- भारतीय सैन्यदलातील शौर्य, पराक्रम आणि त्यागाची गौरवशाली परंपरा लाभलेल्या महार रेजिमेंटचा ८६ वा स्थापना दिवस धुळे येथे मोठ्या देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यश सिद्धी माजी सैनिक सेवा संघ, धुळे, नंदुरबार, नाशिक व जळगाव जिल्ह्यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, तर वीरमाता आणि वीरपत्नींचा सन्मान करून सैनिकांच्या त्यागाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नांतून १ ऑक्टोबर १९४१ रोजी महार रेजिमेंटची स्थापना झाली. भारतीय पायदळातील या रेजिमेंटने विविध युद्धभूमींवर शौर्य आणि पराक्रम गाजवला आहे. परमवीर चक्र, अशोक चक्र, महावीर चक्र, वीर चक्र, कीर्ती चक्र, सेना मेडल तसेच विविध युद्धसन्मानांनी गौरविलेल्या या रेजिमेंटच्या ऐतिहासिक परंपरेचे स्मरण यावेळी करण्यात आले. शहरातील मध्यवर्ती बसस्थानकाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माजी सैनिक व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सैनिक मानवंदना देऊन झाली. त्यानंतर सकाळी वाजता सैनिक सन्मान रॅली काढण्यात आली.

यानंतर शिवतीर्थाजवळील जिल्हा सैनिक बहुउद्देशीय सभागृहात मुख्य कार्यक्रम पार पडला. शहीद जवानांना दीपप्रज्वलन करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी वीरमाता आणि वीरपत्नींचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला महाराष्ट्र एनसीसी बटालियनचे कर्नल संजय कुमार, धुळे येथील ओआयसी कर्नल रणधीर सतीशकुमार देवराम, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ. निलेश प्रकाश पाटील, निवृत्त समाजकल्याण अधिकारी संजय जगन्नाथ सैंदाणे आणि निवृत्त वैद्यकीय अधिकारी गौतम शीलवंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात यश सिद्धी माजी सैनिक सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष भीमराव शंकर बोरसे, उपाध्यक्ष रोहिदास दौलत बैसाणे, हवालदार रामचंद्र रघुनाथ जाधव, कॅप्टन बदलत मोरे, कॅप्टन सुधीर अहिरे, कॅप्टन देवानंद आखाडे, सुभेदार सदाशिव भंगारदिवे, सुभेदार मेजर दादा दौलत निकम, सुभेदार अशोक नामदेव तावडे, सुभेदार भाईदास तोताराम बैसाणे, सुभेदार प्रकाश हालिंगे, सुभेदार निंबा दास हालिंगे, हवालदार रविकांत किसनराव खंडारे, हवालदार आत्माराम बापू वाघ, हवालदार सुभाष भगवान सूर्यवंशी, हवालदार निंबा बारका आखाडे, हवालदार भगवान शंकर बोरसे, हवालदार राजेंद्र चौधरी, हवालदार विश्वास अहिरे, हवालदार राजेंद्र सावंत, हवालदार दिलीप पाटोळे, हवालदार साहेबराव जाधव, हवालदार भाईदास पवार, हवालदार संजय रणदिवे, हवालदार शेणपडू पवार, हवालदार गंगाराम निकम, हवालदार सिद्धार्थ राजधर मोरे, हवालदार कैलास धर्मा झाल्टे, हवालदार कैलास भामरे, हवालदार गोरख मंगळे आणि हवालदार दीपक आत्माराम शिरसाट यांच्यासह माजी सैनिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निधन वार्ता**

### अरुण सांगळे



धुळे, दि.१- येथील जिल्हा परिषदचे सेवानिवृत्त कर्मचारी अरुण काशिनाथ सांगळे यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुली, जावई, सुना व नातवंडे, असा परिवार आहे. विशाल व समीर सांगळे यांचे ते वडील होत.


सोफा, डायनींग टेबल, सोफा- कमबेड, पलंग, दिवान, टिपाई, कपाट, ड्रेसींग टेबल, आराम चेअर, ऑफीस टेबल ऑफीस चेअर तसेच वास्तु-शास्त्रा योग्य शेवन लाकडाचे मंदिर तसेच मार्बलचे मंदिर आणि तुळशी वृंदावन..



**शिवम कॉर्पोरेशन**
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

**पाहिजे**
घर कामासाठी बाई पाहिजे.
-: एरीया :-
वाखारकर नगर, धुळे
वेळ :- स. ९ से दु. २ पर्यंत
-: संपर्क :-
8149152161

**पाहिजेत**
नवी क्रेटा गाडीसाठी कायमस्वरुपी व अनुभवी चालकाची आवश्यकता आहे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
9822408140

**पाहिजेत**
दुकान कामासाठी मेहनती जेन्टस व लेडीज लावणे आहेत.
हेल्पर : २ जागा
सेल्समन : २ जगा
शाह हॅन्डलुम
१४६४, गल्ली नं. २, नवग्रही
पारोळा रोड, धुळे
9422792384

**पाहिजेत**
TASTY TOWN – FOOD & FESTIVE HUB
फूड कोर्ट (खाऊ गल्ली) साठी सुवर्णसंधी!
स्थान: प्रकाश टाकी जवळ, पारोळा रोड, धुळे
खाऊ गल्लीतील खाद्यपदार्थांची दुकाने भाडे तत्त्वावर उपलब्ध आहेत. तसेच, मार्केटिंगसाठी मुलं व मुली पाहिजेत
* आकर्षक पगार
* इन्सेन्टिव्हची सुविधा
* फ्रेशर्सना प्राधान्य
* चांगल्या संवाद कौशल्याला प्राधान्य
इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क:- विजय जैन
98231 63447
75887 35148

**कामे करुन मिळतील**
मालमत्ता (घर, दुकान, जमीन) सिटी सर्वे ऑफिस उतारे, तलाठी ऑफिस उतारे, नाव लावणेबाबत व मालमत्ता विषयक सर्व कामे करुन मिळतील!
-: संपर्क :-
8888022577

**फ्लॅट भाड्याने देणे आहे**
सर्व सोईयुक्त 1 BHK फ्लॅट
२४ तास पिण्याचे पाणी व गरम पाण्यासह फ्लॅट भाड्याने देणे आहे.
पत्ता : -
पार्श्वनाथ अपार्टमेंट
अशोक नगर
पाण्याची टॉकीसमोर
जमनागिरी रोड, धुळे
-: संपर्क :-
9209109678

**नोकरीची संधी**
हॉस्पिटल OPD साठी महिला रिसेप्शनिस्ट आवश्यक
पद: महिला रिसेप्शनिस्ट
कार्यस्थळ: हॉस्पिटल OPD
ड्युटीची वेळ व पगार मुलाखतीदरम्यान अनुभव व पात्रतेनुसार निश्चित करण्यात येईल.
इच्छुक उमेदवारांनी आपला Resume/Biodata पाठवावा व मुलाखतीसाठी अपॉइंटमेंट घेण्यासाठी खालील क्रमांकावर आजच संपर्क साधावा.
9158587711
9272587711

**विकणे आहे**
अग्रवाल नगरच्या बाजूला ४ बीएचके फ्लॅट
अग्रवाल नगर जवळ नवीन 4 BHK बीएचके फ्लॅट त्वरीत विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**शॉप-दुकान विकणे**
मनोहर टाकीज समोर छत्रपती शिवाजी महाराज कॉम्प्लेक्समध्ये आग्रारोड टच दुकान विकणे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**विकणे आहे**
बडगुजर प्लॉटमध्ये ५००० फुट विकणे आहे.
धुळे शहरापासून अगदी जवळ बडगुजर प्लॉट सारख्या सुशिक्षित वसाहतीत ५००० फुटाचा दोन रोड कॉर्नर प्लॉट योग्य किंमतीत विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**तुळशीराम नगर प्लॉट विकणे**
धुळ्यातील सुप्रसिद्ध तुळशीराम नगरच्या पॉश वसाहतीत ३१०० फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**शेती विकणे आहे**
तिखी तलाव १ एकर शेती विकणे डेडर गाव तलावाजवळ तिखी रोडटच एक एकर शेती फार्म हाऊस लायक विकणे आहे.
-: संपर्क :-
डी. आर. प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

**पाहिजेत**
मशीन ऑपरेटर
बॅनर प्रिंटींग मशीनसाठी
लक्ष डिजीटल
सुभाष पुतळा मागे, औदुंबर मारुती मंदिर, ग.नं.७ धुळे
मो.87931 82796 / 9764832896

**अकौंटंट पाहिजे**
लेडीज/जेन्टस
-: संपर्क :-
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड, प्रकाश टॉकीजसमोर, धुळे
9423135555

**प्लॉट विकणे आहे**
नगांव येथील अंदाजे १००० स्क्वे.फुट प्लॉट योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
-: संपर्क :-
प्रसाद पाटणकर
9422275567

**पाहिजेत**
अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे
9422286958

**पाहिजेत**
नामांकित कंपनीमध्ये मुले पाहिजेत.
दुचाकी (टू-व्हिलर) आवश्यक.
टिप : शिक्षण १० वी, १२ वी पास
-: मोबाईल क्रमांक :-
9588414547
7666584449

**गाळे विकणे**
टावर गार्डन जवळ दुसरा मजला फर्निचर व A/C सह गाळे विकणे आहे.
-: संपर्क :-
9422288002

**पाहिजेत**
सुप्रसिद्ध बेकरी मध्ये Sales and Delivery प्रतिनिधी पाहिजे.
लिहिता, वाचता, हिशोब करता येणे आवश्यक
चांगला पगार व इंसेंटिव
लाईफ लाईन बेकरी
मालेगांव रोड, धुळे
: संपर्क :
7507699616

**WANTED**
PART OR FULLTIME PHARAMCIST
CONTACT
8788637592

**घर भाड्याने देणे**
शुभाष चौक, फुले कॉलनी समोर, घर भाड्याने देणे आहे.
-: संपर्क :-
9822892958

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**




क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
59 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक अ‍ॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०